# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ११७ वा ❑ बुधवार दि.१८ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## कुंडमळा पुल दुर्घटनेला जबाबदार कोण?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

मृत्यू, मग तो कुणाचाही असो, ती वाईट घटनाच असते. अपघाती किंवा अचानक झालेल्या मृत्यूच्या अपघातानंतर त्यांच्या नातेवाईकांवर प्रचंड संकट कोसळलेले आपण नेहमी पाहतोच. मुंबई किंवा बड्या महानगरांमध्ये हे आता नित्याचे झाले आहे, तरीही मृत्यूची संवेदना हेलावून टाकते.

मावळातील इंद्रायणी नदीवरील कुंभमळा येथील ३५ वर्ष जुना पूल जीर्ण झाल्याने नवीन मुलाला निधी मंजूर झाला मात्र आदेश मिळवूनही काम सुरू झाले नसल्याने जुन्या पुलावरून वाहतूक लोकांनी सुरूच ठेवली प्रशासनाने या पुलावरून वाहतूक बंद केल्यानंतर देखील लोकांनी प्रशासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष केले. बेजबाबदार जनता व सुस्त प्रशासनामुळे हा अपघात होऊन काहींचे बळी तर कित्येक जखमी झाले.

कुंडमळ्याच्या घटनेत आतापर्यंत एकूण ५१ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. ४ जणांचा मृत्यू झाला. आठ जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर इतर ३२ जण किरकोळ जखमी आहेत. दरम्यान, हा पूल धोकादायक असल्याचा फलक लावण्यात आला होता. मात्र पर्यायी मार्ग नसल्यानं स्थानिकांना याच पुलाचा वापर करावा लागला. त्यामुळे या दुर्घटनेला जबाबदार कोण असा सवाल उपस्थित होत आहे.

जिल्हा प्रशासन बांधकाम विभागाकडे पुलाच्या मेंटेनन्सची जबाबदारी होती.

शेलारवस्ती आणि कुंडमळा वस्तीतील नागरिकांना पायी वापरासाठी होता. मात्र दुचाकीवरुनही प्रवास केला जायचा. दरम्यान दीड वर्षांपूर्वी पूल वापरासाठी बंद करण्यात आला होता. येथील ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाने तसे सूचना फलक लावण्यात आले.

मात्र पर्यायी व्यवस्था नसल्याने वळसा मारून जाण्यापेक्षा लोक याच पुलावरून ये जा करत.हा पूल जर बंद झाला तर ८ ते ९ किलोमीटरचा वळसा मारुन, साधारण २० ते २५ मिनिटांचा प्रवास करुन जावं लागत.

**पर्यटक जाऊ न देण्याची जबाबदारी कोणाची?**

ग्रामपंचायतीने दोन्ही बाजूंनी सूचना फलक लावले होते. त्याव्यतिरिक्त सुट्ट्यांदिवशी पोलिसांनी लक्ष देणे अपेक्षित होतं. मात्र पर्यटक स्थानिकांसह पोलिसांना ही जुमानत नव्हते असं ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे. लोक जात आहेत तर ते खाली पडू नयेत, म्हणून पुलावरील लोखंडी भागात संरक्षण जाळ्या लावण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे नवा पूल उभारण्यात दिरंगाई झाल्याचे स्थानिक सांगतात. ११ जुलै २०२४ ला नव्या पुलाच्या कामाला मंजुरी देण्यात आली असं पत्र तत्कालीन बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी मावळचे भाजप नेते रवींद्र भेगडेंना दिलं होतं. प्रत्यक्षात १० जून २०२५ ला काम सुरु करण्याचे आदेश पत्र ही निघाले. मात्र अद्याप कामाला सुरुवात नाही.

रविवारी सुट्टीचा दिवस असल्यामुळे कुंडमळा येथे पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. १०० ते १५० पर्यटक पुलावर उभे होते. त्याचवेळी पूल मधोमध तुटून कोसळला, आणि अनेकजण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. आरडाओरडा, घबराटीचे वातावरण निर्माण झाले. काही स्थानिक तरुणांनी प्रसंगावधान राखून पाण्यात उड्या टाकून काही पर्यटकांचे प्राण वाचवले. तत्काळ तळेगाव पोलीस, अग्निशमन दल, वन विभाग, बचाव पथके व स्वयंसेवी संस्था घटनास्थळी दाखल झाल्या आणि मदतकार्य सुरू केले. घटनास्थळावर नागरिकांची गर्दी झाली होती.या गर्दीवर नियंत्रण कोणाचेच का नव्हते?

इंद्रायणी नदीवरचा पूल कमकुवत झाल्यानं त्यावरून ये-जा करण्यास मनाई होती, मग पर्यटक पुलावर कसे काय चढले?पर्यटकांनी पुलावर जाऊ नये म्हणून प्रशासनाने कोणाला जबाबदारी दिली होती ? अन ते रविवारी कुठं होते.हा पूल दीड वर्षांपूर्वी वापरासाठी बंद केला होता, तर तेंव्हापासून पर्यायी व्यवस्था का करण्यात आली नाही.गेल्या दीड वर्षात नवा पूल उभारायला सुरुवात का झाली नाही?आता १० जूनला टेंडर आणि वर्क ऑर्डर काढल्याचा दावा आहे, पण गेली दीड वर्ष ही दिरंगाई कोणामुळं?






## मराठी अभिनेत्याला नाटकाच्या प्रयोगाआधी हृदय विकाराचा झटका; डॉक्टरांना म्हणाला, ''मला ३ तासांची परवानगी द्या''

### नाटकाच्या प्रयोगाआधी मराठी अभिनेत्याला हृदय विकाराचा झटका, पत्नीने दिली माहिती


ज्योतिर्मय साहित्य

'सुंदर मी होणार' या नाटकात महत्त्वपूर्ण भूमिका साकारणाऱ्या अभिनेता अमोल बावडेकरला रविवारी प्रयोगाआधी हृदयविकाराचा झटका आल्याने या नाटकाचा प्रयोग रद्द करण्यात आला. हा प्रयोग विलेपार्ले येथील दीनानाथ नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. सध्या अमोल बावडेकरची प्रकृती स्थिर असून त्याच्यावर अँजिओग्राफी करण्यात आली आली आहे.

या नाटकाचे दिग्दर्शक राजेश देशपांडे यांनी इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत यासंदर्भात माहिती दिली आहे. अमोलच्या प्रकृतीबद्दल समजल्यावर रविवारचा प्रयोग तात्काळ रद्द करण्यात आला आणि निर्मात्यांनी प्रेक्षकांना तिकिटाचे पैसे परत केले. आता अमोलच्या जागी पुढचे काही दिवस या नाटकात अभिनेता अनिरुद्ध जोशी झळकणार आहे, असं दिग्दर्शकांनी स्पष्ट केलं आहे.

दिग्दर्शक पोस्ट शेअर करत लिहितात, ''रविवारी सकाळी 'सुंदर मी होणार' या नाटकाच्या प्रयोगाला काही तास उरले असतानाच अभिनेते अमोल बावडेकर यांना हृदयविकाराचा झटका आला. अमोल यांच्या पत्नी प्रेरणा बावडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यावरही बावडेकर यांनी डॉक्टरांना विनंती केली की, ''मला फक्त तीन तासांची परवानगी द्या. मी प्रयोग करून येतो आणि मग तुम्ही माझी शस्त्रक्रिया करा.''

''मात्र, डॉक्टरांनी अर्थात याला परवानगी दिली नाही. त्यामुळे दीनानाथ नाट्यगृहातील जवळपास हाऊसफुल्ल प्रयोग रद्द करावा लागला. डॉक्टरांनी त्यांना सध्या




विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असला तरी, ते लवकरच 'सुंदर मी होणार' या नाटकाच्या प्रयोगांसाठी परत येतील.'' असं दिग्दर्शकांनी स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, अमोल बावडेकरच्या अनुपस्थितीत नाटकाचे पुढील काही प्रयोग अभिनेता अनिरुद्ध जोशी करेल अशी माहितीही निर्मात्यांनी दिली आहे. याशिवाय अमोल सध्या 'तुला जपणार आहे' या 'झी मराठी'च्या मालिकेत महत्त्वपूर्ण भूमिका देखील साकारत आहे.

तसेच, सुंदर मी होणार या नाटकाविषयी सांगायचं झालं तर, पु. ल. देशपांडे यांचं 'सुंदर मी होणार' हे नाटक तब्बल तीस वर्षांनी पुन्हा रंगभूमीवर आलं आहे. 'सवाईगंधर्व' निर्मित 'अभिजात' प्रकाशित या नाटकाची दिग्दर्शकीय धुरा राजेश देशपांडे सांभाळत आहेत. विद्याधर जोशी, अभिजीत चव्हाण, स्वानंदी टिकेकर, सृजन देशपांडे, श्रुती पाटील, विराजस ओढेकर, आस्ताद काळे, श्रुजा प्रभुदेसाई असे अनेक कलाकार या नाटकात महत्त्वपूर्ण भूमिका साकारत आहेत.

(सौजन्य : लोकसत्ता )



## आषाढी एकादशीच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी महापूजेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निमंत्रण

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापुजेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने निमंत्रण देण्यात आले.

यंदाच्या आषाढी एकादशी दिवशी रविवार, दि ६ जुलै, २०२५ रोजी पहाटे २.२० वाजता मुख्यमंत्री फडणवीस व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची शासकीय महापूजा करण्यात येईल. या महापूजेचे निमंत्रण देण्यासाठी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज-औसेकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची वर्षा निवासस्थान, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांचा मंदिर समितीच्या वतीने विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, उपरणे, चिपळ्या देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

मंदिर समितीमार्फत आषाढी यात्रेच्या नियोजनाची तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन कामाची तसेच विठ्ठल रुक्मिणी मातेचे जलद व सुलभ दर्शन होण्याच्या दृष्टीने राबवण्यात आलेल्या टोकन दर्शन प्रणालीची तसेच अन्य व्यवस्थेबाबत माहिती देण्यात आली.

## सूक्ष्म सिंचन हा कृषी क्षेत्रातील आणखी एक नवीन प्रयोग



ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

स्वयंसहायता गट आणि ग्रामीण सहकारी बँकांच्या विकासामुळे आर्थिक समावेशन आणि महिला सक्षमीकरणाला चालना मिळाली आहे. उदाहरणार्थ, दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान, महिलांना स्वयंसहायता गटांमध्ये संघटित करण्यावर आणि त्यांना शाश्वत उपजीविकेच्या संधींशी जोडण्यावर लक्ष केंद्रित करते. हे गट केवळ उत्पन्न निर्मितीच नव्हे तर सामाजिक भांडवल आणि सहभागी विकास देखील सुलभ करतात.

२६ अंत्योदय योजना प्रथम राजस्थानचे तत्कालीन मुख्यमंत्री (मुख्यमंत्री) भैरोंसिंग शेखावत यांनी लागू केली होती. सर्व शिक्षा अभियान आणि आयुष्मान भारत सारख्या योजनांद्वारे शिक्षण आणि आरोग्यसेवेवरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, ज्यामुळे ग्रामीण भारतातील मानवी भांडवलात सुधारणा झाली आहे. डिजिटल इंडिया मिशन अंतर्गत डिजिटल पायाभूत सुविधांच्या वाढीमुळे ग्रामीण लोकसंख्येला सरकारी सेवा, शैक्षणिक सामग्री आणि आर्थिक साधने उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.




वाढत्या हवामान परिवर्तनशीलतेसह, अलिकडच्या वर्षांत ग्रामीण विकास धोरणांमध्ये शाश्वतता आणि हवामान अनुकूलन यांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम आणि जल जीवन मिशन सारखे कार्यक्रम जलसंवर्धन आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यावर भर देतात. त्याचप्रमाणे, परंपरागत कृषी विकास योजने अंतर्गत सौर सिंचन पंपांसाठी अनुदान आणि सेंद्रिय शेतीसाठी पाठिंबा हे ग्रामीण विकास पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत बनवण्याचे उद्दिष्ट ठेवतात. ग्रामीण विकासात आता केवळ भौतिक पायाभूत सुविधांचा समावेश नाही तर कृषी-आधारित उद्योग, मध आणि हस्तकला समूह, ग्रामीण पर्यटन आणि डिजिटल उद्योजकता यांचाही समावेश आहे, ज्यामुळे शेतीपलीकडे ग्रामीण अर्थव्यवस्थेत विविधता येत आहे. शाश्वत आणि स्थानिक पातळीवर उत्पादित वस्तूंची मागणी वाढत असताना, या क्षेत्रांना राष्ट्रीय आणि जागतिक बाजारपेठा मिळत आहेत, ज्यामुळे ग्रामीण भागात रोजगार आणि उत्पन्न निर्मितीत हातभार लागत आहे.



## आठवणींच्या रोजनिशीतील काही पाने..भाग १

मी तिसरी ते पाचवीत असताना आम्ही भावंडे आणि आई कोल्हापूर मध्ये रहात होतो.तात्या बोरगाव मध्ये हेडसर होते आणि तिथले घर,शेती हा सगळा व्याप सांभाळून ते शनिवार/रविवारी कोल्हापूरला येत.

आर्थिक,कौटुंबिक अडचणी काय असतात आणि त्यासाठी किती झळा सोसाव्या लागतात,त्याग करावा लागतो हे सगळे मला मी संसाराला लागल्यावर अनुभवातून समजले..तो पर्यंत आमच्या घरी मला कळता कधी ना फार मोठी भांडणे होत किंवा ना वादविवाद त्यामुळे या सगळ्यापासून मी अनभिज्ञ होते.

आई आमच्याच शाळेत शिक्षिका होती.(श्रीराम विद्यालय) तिचा पहाटे चार वाजता दिवस सुरू होई.ती त्या काळची सातवी पास होती.तिचे पुढचे शिक्षण,शाळा आणि चार मुलांची जबाबदारी यात आई अगदी बुडून गेलेली असे.ती माझ्या वाट्याला खूप कमी वेळ येई. माझी भावंडे मात्र खूप मायेने माझे सर्व ताल सांभाळत असत..

एकदा मी चौथीला असताना शाळेच्या जिन्यावरून गडगडून खाली आले.पावसाळ्याचे दिवस होते. हाता पायाला थोडे खरचटले.मी इतिहास शिकविणाऱ्या बाईंची मुलगी आहे हे सगळ्यांना माहीत होते.त्या मुळे मी पडल्याची बातमी आईपर्यंत लगेच गेली.आई पळत पळत आली.मी रडत होते..तिने आल्याबरोबर मला घट्ट कुशीत घेतले.आपल्या नऊवारी सुती पदराच्या साडीने डोळे पुसले.आणि तिच्या कडेवरून आम्ही दोघी घरी जाण्यासाठी निघालो.माझा पाय थोडा मुरगळला होता त्यामुळे दुखत होता. आई मला म्हणाली मी तुला कडेवर घेते पण अधून मधून तू अगदी थोडे चाल कारण आमचे घर खूप दूर होते.वाटेत जाताना तुझ्यासाठी मी तुला खायला ब्रेड घेते. ( त्या काळी बाहेरचे खाणे जवळ जवळ वर्ज्य होते..ब्रेडही क्वचित घरी आणला जायचा आणि मला ब्रेड दूध/चहा खूप त्या काळी खूप आवडत असे) पण मी चालायला तयार नव्हते मला ब्रेड नको पण मी चालणार नाही असा हट्ट करू लागले..मग आईने रिक्षा केली आणि ब्रेडही घेतला.तिची आर्थिक चणचण त्या वयात माझ्या लक्षातच आली नव्हती.

आता अजूनही अधून मधून माझा पायरीचा अंदाज चुकतो.आणि तशीच गडगडत मी खाली येते.थोड्याशा जखमेनेही लगेच डोळे भरून येतात पण ते डोळे पुसणारा आईचा पदर आणि तिची घट्ट मिठी मात्र हरवून गेलीय याची खोल जाणीव मनाचा तळ हलवून सोडते..🥺❤️🙏

सौ.माधुरी म.इनामदार

मिरज.




# जात्यावरच्या ओव्या......

आखूड बंदुकीचा
बार कुणीकडे झाला ?
मामाच्या नगरात
भाचा शिकारीला गेला ||१२७||

मांडवाच्या दारी
घागर सांडली तुपाची
गवळण बाई
धन्य नवरीच्या बापाची ||१२८||


संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर




# लाईफ इज ब्युटीफुल (माझ्या कवडसे सोनेरी.. अंतरीचे या पुस्तकातील लेख )

ज्योतिर्मय साहित्य

अशा वेळी छोटा जोशुओ हे सगळे पाहून बावरतो. तेव्हा गुडो त्याला सांगतो की हे सगळे एका खेळाचा एक भाग आहे. यातील प्रत्येक जण खेळातील पॉईंटस मिळवण्यासाठी खेळतो आहे. तुलाही जिंकायचे असेल तर खेळाचे काही नियम पाळावे लागतील. दिवसभर लपून राहिलास तर अमुक गुण, जराही आवाज केला नाहीस तर अमुक गुण, उपाशी राहिलास तर अमुक गुण इ. जिंकलास तर खरा रणगाडा भेट म्हणून मिळेल. बिचारा निरागस जोशुओ बापाच्या बोलण्यावर विश्वास ठेवतो. आणि त्याप्रमाणे वागतो. एकदा सैनिक मुलांना अंघोळीच्या नावाने मारण्यासाठी म्हणून घेऊन जात असतात. जोशुआला अंघोळ आवडत नाही म्हणून तो लपून बसतो आणि त्याचा जीव वाचतो. असेच एकदा सैनिक गुडोला मारण्यासाठी घेऊन जातात. यावेळी जोशुआ एका पिंपात लपून बसलेला असतो. यावेळी गुडो जोशुआकडे पाहून डोळे मिचकावतो आणि सैनिकांची नक्कल करतो. अशाही परिस्थितीत त्याची विनोदी वृत्ती आणि धैर्य कायम असते. आपण मात्र या दृश्याने हेलावून जातो. पुढे दोस्त राष्ट्रांचे सैनिक येतात आणि कैद्यांची सुटका करतात. या वेळी अमेरिकन सैनिक एका रणगाड्यावर बसवून जोशुआला घेऊन जातात बिचाऱ्या जोशुआला आपल्याला खरा रणगाडा बक्षीस मिळाला आहे असेच वाटते. इतक्यात त्याला आपली आई दिसते आणि तो आपल्या आईकडे झेप घेतो.





आईच्या गळ्यात पडून तो म्हणतो, ‘ मम्मा, आपण जिंकलो.’ डोरो आपल्या डोळ्यातील पाणी लपवित म्हणते, ‘ हो बेटा आपण जिंकलो. आपल्याला किनई हजार पॉईंटस् मिळाले.’

असा हा नितांतसुंदर चित्रपट. सगळ्याच्या उत्कृष्ट अभिनयाने नटलेला. जीवनातील रणरणत्या वाळवंटात सुद्धा आशेची फुले फुलू शकतात हे दाखवणारा. सकारात्मक संदेश देणारा. असे म्हणतात ते काही खोटे नाही. मानवी आयुष्य हे सुंदर आहेच. त्यावर प्रेम करता आले पाहिजे. मंगेश पाडगावकरांच्या शब्दात सांगायचे तर ‘ या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे. ‘ फक्त तुमच्याकडे बालकासारखे निरागस मन हवे आणि गुडोसारखी अफलातून सकारात्मक दृष्टी. प्रसिद्ध शायर निदा फाजली म्हणतात –

जितनी बुरी समझी जाती
उतनी बुरी नही है दुनिया
बच्चो के स्कूल मे तुमसे
शायद मिली नही है दुनिया.

***



# दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## पादसेवन भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

पूर्वपक्ष आणि सिद्धांत हे वेदांन्त शास्त्रातील विषय मांडण्याची पध्दत आहे. पूर्व पक्षामध्ये स्वस्वरूपाबद्दल शंका किंवा आक्षेप घेतला जातो. सिध्दांतात त्याचे निरसन करून स्वरूप सिध्दि केलेली असते. म्हणून समर्थ सांगतात की जी वस्तु लक्ष देऊन आतमध्ये पहावी, ध्यानामधे त्या वस्तुचे ध्यान करावे. व ते ऐवढे एकरूप होऊन जावे की ती वस्तु आपणचं होऊन जावे.


देव पहाया गेलो । देव होऊनी गेलो.

किंवा देवरूप होऊ सगळेअसेही म्हणले तर ते वावगे होणार नाही.

परमार्थामध्ये किती तरी गोष्टी आपल्याला अज्ञान असतात. द्रुष्य व्यवहारात प्रयत्न करून सर्व गोष्टी साध्य करून घेता येतात. पण सद्गुरू च्या संगतीत राहिलो तरसगळे कळते. समाधानाची अनेक अंगे आहेत. सद्गुरू ची सेवा केल्याने ती आपल्या अंगी प्रगट होऊ लागतात. म्हणून भगवंत भेटीसाठी सद्गुरु भेटणे महत्त्वाचे आहे. दिव्य वनस्पती चे सेवन करणे. विविध मंत्रांचा जप करून सिध्दि मिळवणे. यंत्रांची पूजा अर्चना करून साधना करणे. ज्ञान, भक्ति,कर्म, योगयाग हे आत्मज्ञानाचे अभ्यास विषय हाताळणे. व ज्ञानसंपन्न होणे. परमात्म वस्तुचा अभ्यास करता येत नाही कारण त्याला मीपणा अजिबात आवडत नाही. तो साधनाने साध्य होत नाही कारण साधना करणारा जीव अल्प त्याचे साधन अल्प, साधनकलाहीअल्प असते. त्याच्या विरूध्द परमात्मा सर्व बाजुने अनंत, म्हणून परमात्मा च्या ज्ञानानाचा मार्ग समजून घ्यायचा असेल तर सद्गुरू ची संतांची संगत धरावी. संतांच्या संगती शिवाय परमात्मस्वरूपाच्या अनुभवाचा विषय बोलण्यास जाऊ नये.

समर्थ म्हणतात सद्गुरूच्या चरणसेवा म्हणजे पादसेवन. व्यवहारी जगात जगत असताना देव ब्रम्हज्ञानी संत,सात्विकता, सद्भावना यांचा विसर पडू न देता जीवन जगावे. ही तर समर्थाची शिकवण आहे.

श्री राम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ समास चौथा समाप्त



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# संतांना कसे ओळखावे ?

ज्योतिर्मय साहित्य

धान्यामध्ये काही खडे असे असतात की, धान्यापासून ते वेगळे निवडता येत नाहीत. तांदळांत पांढरे खडे असतात, ते निवडू गेले तरी निवडले जात नाहीत. त्याप्रमाणे साधू लोक हे आपल्यात असतात, त्यांना पाहू गेले तर ते आपल्यासारखेच संसारात वावरत असलेले दिसतात; पण खरे पाहता ते आपल्यापेक्षा वेगळे असतात. पुस्तकांतून साधूची लक्षणे पुष्कळ दिलेली असतात. पण त्याप्रमाणे आपण पाहू गेलो तर साधू ओळखता येईलच असे नाही. साधूचे एकच अचूक लक्षण सांगता येईल, ते हे की, जो सर्व ठिकाणी देवाला पाहू शकतो तो साधू. पण एवढ्यावरून आपल्याला तो ओळखता येईल का ? नाही; तर जेव्हा आपण साधू व्हावे, तेव्हाच आपल्याला साधूला ओळखता येईल.

जगात आपण कुणाचीच निंदा करू नये. आपण जेव्हा दुसऱ्याचे दोष पाहतो, म्हणजेच ते जेव्हा त्याच्याजवळ आहेत असे दिसतात, त्या वेळेस तेच दोष आपल्याजवळ सूक्ष्म रूपाने असतात असे समजावे; आणि आपण लगेच देवाला शरण जाऊन, ‘हे माझे दुर्गुण काढून टाक’, म्हणून त्याची करुणा भाकावी, आपण जेव्हा ‘जगात न्याय उरला नाही’ असे म्हणतो, त्या वेळेस आपल्याजवळ तो दोष आहे समजावे. म्हणून आपण कुणाचे दोष पाहू नयेत. आपण आपल्या स्वत:ला आधी सुधारावे. चित्तशुद्धी केल्याशिवाय आपल्या मनात सर्व ठिकाणी भगवद्भाव उत्पन्न होणार नाही. म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला दुसऱ्याचे दोष दिसतात, तेव्हा आपलेच चित्त अशुद्ध आहे असे समजून आपण परमात्म्याची करुणा भाकून त्याला शरण जावे, आणि ‘माझे चित्त शुद्ध कर’ अशी त्याला विनंती करावी. असे केले म्हणजे आपले चित्त शुद्ध होत जाते, आणि मग भगवंताची प्राप्ती व्हायला वेळ लागत नाही.

जे मिश्रण आहे ते पचायला कठीण असते; उदाहरणार्थ, भाजणी. मिश्रण नसलेले एकच शुद्ध अन्न पचायला सोपे असते. हे जसे खरे, त्याचप्रमाणे आपले अंत:करण अगदी शुद्ध असावे, म्हणजे ते सर्वांमध्ये लवकर मिसळते. पण आपल्या अंत:करणामध्ये स्वार्थाचे मिश्रण असल्यामुळे ते सर्वांमध्ये समरस होऊ शकत नाही. शुद्ध अंत:करणाच्या माणसाचे चालणे हळू, आणि बोलणे मृदू असते. तो सर्वांना प्रिय होतो. जगातले आपले समाधान किंवा असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून असते. ‘माझ्याकरिता मी नसून, मी लोकांकरिता आहे. माझ्याकरिता जग नसून मी जगाकरिता आहे,’ ही वृत्ती आपण ठेवावी.

सर्व चराचर भगवद्रूप जो पाहतो तो साधू.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## महात्म्यांचा अविर्भाव

ज्योतिर्मय साहित्य

त्यांची पदे ही भावपूर्ण आणि सरस आहेत. भक्तांना दीपस्तंभ सारखे मार्गदर्शक ठरणारे यांची व्यक्तिमत्व होते. त्यांच्या दृष्टीने परमात्मा श्रीकृष्ण हा नटवर नागर शाम, भक्तांचा परमपुरुष गोपांचा सखा, यादवांना प्रिय आनंद, यशोदेचा लाडका असा लडिवाळ कृष्ण होता. श्रीकृष्ण एक शाश्वत सत्ता आहे. या शाश्वत सत्तेला पूर्वी दोन प्रकारच्या संतांनी भक्ती केली.

एक प्रवृत्ती मार्ग आणि दुसरा निवृत्ती मार्ग. निवृत्ती मार्गातून निर्गुण परमात्म्याचे भक्तीचा कल दिसून येतो पण ही भक्ती थोडीशी रूक्ष होते. तत्त्वज्ञान हे बहुजन लोकांना समजत नाही.ज्याचेवर भक्ती करावी ते ध्येय नजरे समोर नसेल तर साधारण भक्ताला निर्गुण भक्ती पेलेनाशी होते. म्हणून श्री छीत स्वामींनी प्रवृत्ती मार्गातून भक्ती कशी करावी, भगवंताला कसे आळवावे. त्याच्या सुंदर मोहक मुख कमलाचे वर्णन, त्यांच्या लीलांचे वर्णन यांनी रसपूर्ण भाव कसे निर्माण व्हावेत हे स्वतः जगून स्वतः वागून आणि स्वतःच्या पद रचनेतून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले. म्हणून अष्ट छाप कवी मध्ये छीत स्वामी यांचे स्थान मोलाचे आहे. त्यांच्या चरित्राचे अवलोकन करून लोक

परमेश्वरावर निस्सीम प्रेम करायला लागतील आणि या द्वारे परमेश्वर प्राप्ती निःसंशय होईल ही प्रूष्टी मार्गाची शिकवण ते देत राहतील.

सर्व संतांनी जगाला भरभरून दीले,आपली लाख मोलाची साधना आपल्या किरकोळ प्रापंचिक मागण्या साठी कवडी मोल भावात खर्च केली.आपण मात्र त्यांना छळले. शास्त्राचे आमच्या फायद्याचे अर्थ लावून संताना आम्ही नाडले.संतांचे लाख मोलाचे आशीर्वाद आम्ही घेतले पण त्यांचे पुढे समर्पण म्हणून आम्ही कुजका दानाच ठेवला. त्यांच्या संसारातील अभाव आम्ही दुर्लक्षित केला. आम्ही बंगला, कार, एसी उपभोगले संताना मात्र झोपडीच असते हा समाज करून घेतला. या छळाला कंटाळून बहुतेक संत अल्प आयुष्यात देह ठेवते झाले. म्हणून मला असे वाटते की प्रभूची आपणा भारतीयांवर अकारण कृपा आहे की संतांच्या मांदियाळी आम्हास भेटल्या, पण आम्हीच करंटे की आम्ही आध्यात्मिक लाभ घेण्या ऐवजी प्रापंचिक मागण्या त्यांचे समोर मांडून त्यांची दिव्य शक्ती ओरबाडून घेतली. खरे सोने आम्ही चने फुटाणेच्या भावात खर्च केले. येथून पुढे तरी आपण सावध होऊयात आणि संताना जगणे सुसह्य होईल असे करुयात.

विनम्र अभिवादन!

अति विशिष्ठ आविर्भाव

श्री राधा राणी

भगवान श्रीकृष्णांच्या जीवनात सर्वाधिक महत्त्वाची व्यक्ति म्हणजे श्री राधा राणी होय. श्री राधा म्हणजे खरे तर भगवान श्रीकृष्णाचे स्त्री रूप होय. राधा राणी आणि कृष्ण हे वेगळे नाहीतच. भगवंताचा स्त्रि रूप अविर्भाव म्हणजे श्री राधा राणी. परमात्मा परमेश्वर श्रीकृष्ण भगवान यांची शक्ती म्हणजेच आदीमाया, महामाया, भगवती, महालक्ष्मी, श्री राधा राणी होय. गो लोक धामा मध्ये भगवंता बरोबर नित्य निवास करणारी, भगवंताच्या सान्निध्यात अविचलपणे त्यांचे सोबत राहणारी आदिशक्ती म्हणजेच श्री राधा राणी होय. श्री राधा राणी शिवाय श्रीकृष्ण भगवान पूर्ण नाहीत. इतके महत्त्व श्री राधा राणीला आहे. महाभारतात, भागवत महा पुराण यामध्ये श्री राधेचा उल्लेख नसल्याने, आणि श्रीहरी विजय या ग्रंथातही, तो अल्पसा असल्याने, आपणा महाराष्ट्रीयन लोकांना श्री राधा राणी फारशी माहितीच नाही. कृष्ण भक्ती करणारी, भक्तीत निपुण असणारी राधा, एवढेच आपल्याला राधे विषयीचे ज्ञान आहे. प्रत्यक्षात स्कंदपुराण, ब्रह्मवैवर्त पुराण आणि गर्गसंहिता या साऱ्या ग्रंथात राधा राणीचे महत्त्व यथार्थपणे मंडीत केलेले आहे. राधा राणीचा जन्म (खरे तर अविर्भाव) हा श्री वृषभान आणि कीर्ती देवी या दाम्पत्याच्या पोटी, वृंदावन जवळील, रावल या गावी झाला. खरे तर किर्ती देवी गर्भवती होती.ती प्रसूत झाली, पण प्रत्यक्षात ईश्वरी प्रेरणेने महा मायेच्या योगाने, फक्त वायु प्रसुत झाला. आणि त्याच वेळी रावल या गावीच एका कुंडामध्ये श्री राधा राणी शिशु रुपात अवतीर्ण झाली. तिचां वृषभान व किर्तिदा यांनी स्वतःची मुलगी म्हणून सांभाळ केला. स्वतः वृषभान हे सूर्य नारायणाचे अवतार होते. **(क्रमशः)**



# ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं रेणुराजसुते नमः।**
**भक्तकामप्रदे देवि नमो नमो नमो नमः।। ३७ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो.रेणुराजाच्या सुते, तुला नमस्कार असो. भक्तांच्या कामना फलद्रूप करणारे देवी, तुला त्रिवार नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं चन्द्रहाससुशोभिते।**
**शस्त्रहस्ते नमस्तुभ्यं सिंहध्वजे नमोस्तुते।। ३८ ।।**

जिच्याहातामध्ये, चंद्रहास नावाची तलवार शोभून दिसते, अशाजगदंबिके, तुला नमस्कार असो. हातात शास्त्रे धारण करणारे, तुला नमस्कार असो. सिंह जिचे वाहन आहे, अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं प्रसन्नवदने नमः।**
**सुहास्यवदने देवि त्वत् प्रसादाय काङ्क्ष्ये।। ३९ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. हेप्रसन्नवदने तुला नमस्कार असो. हे सुहास्यवदने देवी, मी तुझ्या प्रसादाची कामना करतो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं नमो नमः।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कल्पवल्लि नमो नमः।। ४० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. हे कल्पवल्ली, तुला नमस्कार असो.

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

सीता मोठी झाली योग्य वेळेतच जनकाने सीतेचे स्वयंवर योजले. त्याने विश्वामित्रांना निमंत्रण दिले.त्यांचा सोबत दोन तेज:पुंज देखणी तरुण मुले होती. कोण हे जनकास कळेना. या तिघांची राहण्याची उत्तम व्यवस्था जनकाने केली.

हे दोन कुमार मिथिला नगरी पहायला निघाले.यांन्चे देखणे रूप पाहून लोक मोहित झाले. रोज ते बाहेर पडत. एकदा विश्वामित्रांनी पूजेसाठी फुले मागितली. राम लक्ष्मण बागेत गेले.राम म्हणाले मालकाला विचारल्या शिवाय फुले तोडू नयेत.त्यांनी माळ्याला विचारले. त्याच वेळी सीता माता तिथे आल्या.त्या तेथील मंदिरात प्रार्थना करीत असताना त्यांच्या सख्या बाहेर फिरू लागल्या. त्यांनी या दोघांना पाहिले आणि स्तब्धच झाल्या.काय करावे सुचेना त्या माघारी गेल्या व सितेस बाहेर घेऊन आल्या. सीतेने रामांना पाहिले. हे पहिले दर्शन.सीतेस पाहून श्री राम त्यांचेशी थोडे बोलले. सिता माता परत मंदिरात गेल्या व हाच नवरा मला हवा तो दे ही प्रार्थना जगदंबे जवळ त्यांनी केली. रामांना सीता भेटली, मी बोललो ही गोष्ट विश्वामित्राला सांगितली.त्यांनी अधीरता न दाखवता गप्प बसले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

उर्मिला जनकाची स्वतःची मुलगी होती. तरीही ते सितेवर अधिक प्रेम करायचे. तरीही उर्मिला यामुळे उलट आनंदित होई. तिचे मन किती निर्मळ असेल?

स्वयंवर सुरू झाले ते महाकाय धनुष्य उचलण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले पण कोणासही ते धनुष्य किंचित तही हलेना. **(क्रमशः)**



आरोग्य संजीवनी

# झोपण्याअगोदर दूध का प्यावे

ज्योतिर्मय साहित्य

खूप स्त्रियांना आणि आईंना दूध आवडत नसते. पण काही मातांना ते आवडत असते. पण दूध हे आवडत असेल किंवा नसेल तरीही प्यायला हवे. कारण दूध हे शाकाहारी आहे आणि खूप काही पौष्टिक घटक त्यातून मिळत असतात. त्यामुळे तुमचे शरीर तर सशक्त होतेच पण होणाऱ्या किंवा झालेल्या बाळाला खूप लाभदायक आहे. ह्यातून तुम्हाला खूप सारे पौष्टिक घटक मिळतात. लहान बाळासाठी पूर्णान्न असलेले दूध. दुधात आयर्न, मॅग्नेशियम, मँगेनीज, तांबे, पोटॅशियम, सेलेनियम, झिंक, फॉस्फरस ही खनिजे उत्तम प्रमाणात उपलब्ध असतात. एक कप जरी दूध घेतले तरी तुम्हाला त्यातून १३० कॅलरीज मिळतात.

शांत व गाढ झोप लागण्यासाठी कोमट दूध घेतलेले बरे. कोमट दूध प्यायल्याने खूप गाढ झोप लागत असते. पण ह्यासोबतच इतरही फायदे तुम्हाला मिळतात ते ह्या माहितीमधून बघू.

रात्री झोपताना दूध प्यायले तर तुमचे पोट भरलेले राहते आणि तुम्हाला लवकर भूक लागत नाही. त्यामुळे तुम्हाला वजन कमी करायचे असल्यास रात्री झोपताना दूध पिणे हा उत्तम पर्याय ठरु शकतो. प्रक्रिया केलेले दूध पिणे जास्त चांगले.



कोमट दूध प्यायल्याने शरीरातील स्नायू शिथिल होण्यास मदत होते. स्नायू शिथिल झाले की शांत आणि चांगली झोप लागते. त्यामुळे झोपण्यापूर्वी कोमट दूध पिणे गाढ झोप लागण्यासाठी उपयुक्त असते. आणि ॲसिडिटी वरती थंड दूध खूप लाभदायक ठरत असते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

दूधामध्ये असणाऱ्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. रक्तदाब नियंत्रित राहील्यास हृदयावर ताण येत नाही आणि हृदयाशी संबंधित तक्रारी उद्भवण्यापासून आपली सुटका होऊ शकते. आणि जर तुम्हाला खोकला किंवा कफ किंवा सर्दीही असेल तर तुम्ही आयुर्वेदाप्रमाणे दूधामध्ये हळद टाकून दूध प्यायला हवेच. आले टाकून प्यायल्यास प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. विविध कारणांनी होणाऱ्या व्हायरल इन्फेक्शनपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी हे उपयोगी ठरते.

# फुलमाला....





कर्दळ....

नेहमीच हिचे खुलते रूप
त्यात वसंताची अलगद फुंकर
अलवार पाकळी उमलता
फुल दिसते आणखीच सुंदर

शुभ कार्यात मान हिला
डौलात उभी राहते कर्दळी
हिच्या गोड सहवासात
प्रसन्न दिसते सृष्टी सगळी...

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

रात्र गंभीर गंभीर होत चाललेली असते. मुलांचे गाणेही थांबलेले असते. गुडूप अंधार पडलेला असतो. दूर दूर गावातील रस्त्यातून एखाद दुसरा दिवा क्वचित मधून मधून लुकलुकत असतो. पुढे तेही दिवे रस्त्यातून जायचे बंद होतात. आकाशातील तार्यांच्या प्रकाशाशिवाय कुठेही प्रकाश नाही दिसत. मला झोप येऊ लागते. ती येऊ लागली की मी हळूहळू उठतो आणि झोपायला जातो. नंतर बऱ्याच वेळाने केव्हातरी पूर्वेकडील दरवाज्यातून दिसणारे आकाश अंधार फिकट होत जाऊन हळूहळू उजळू लागते. जवळपासच्या झाडात एखाद दुसरी सारिका खसपस करीत असते. ढगांवर सोनेरी छटा उमटू लागते. थोड्याच वेळात साडेचारच्या घंटेचे टोल ऐकू येऊ लागतात. मी उठून पूर्वेकडील गच्चीतील दगडी चौरंगावर आसन पसरून उपासनेला बसतो. सूर्य हळूहळू वर येऊन आपल्या प्रकाशाच्या स्पर्शाने मला आशीर्वाद देतो. आजकाल अगदी सकाळीच मला न्याहरीला बसावे लागते. कारण साडेसहा वाजता आश्रमातील सर्व बालक मंडळी विद्यालयाच्या समोरील मैदानावर एकत्र होते.

तेथे कोणते ना कोणते गाणे म्हटल्यानंतर विद्यालयाचे काम सुरू होते. पहिल्या घंटेला मला वर्ग नसतो. पण त्या वेळात मी माझ्या खोलीत जाऊन शिकवायची पुस्तकं आणि टिपणही नजरे खालून घालतो. मग माझे काम सुरू होते. दिवस-रात्र चालणाऱ्या माझ्या कामाचा हिशेब मी तुला दिला. किती शांतपणे दिवस जातो माझा ! मुलांसाठी हे असे काम करणे मला खूप आवडते. मी त्यांच्यासाठी हे जे काम करतो त्याला काही मोल आहे याची त्यांना कल्पना नाही. सूर्याच्या प्रकाशाचा फायदा अनायासे ती जशी घेत असतात, तशीच ती आमच्या सेवेचा फायदा घेत आहेत. पुढे ही मुले जेव्हा मोठी होतील, तेव्हा मग त्यांना येथील एक एक गोष्ट आठवू लागेल. येथील आकाशातील विपुल प्रकाश, इथे वाहणारे खुले वारे आणि सकाळी आणि संध्याकाळी झाडाखाली बसून शांतपणे देवीला केले जाणारे नमन सारे आठवेल.''


सत्येंद्रनाथ टागोर हे रवींद्रनाथांचे वडीलबंधू. ते आपल्या सेवाकाळात महाराष्ट्रात जिल्हाधिकारी आणि जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. इंदिरादेवी ही त्यांची मुलगी. १८८५ ते १८९५ या दहा वर्षांच्या कालखंडात त्यांनी तिला अनेक पत्रे लिहिली. या काळात ते तेव्हाच्या पूर्व बंगालमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये असलेल्या आपल्या इस्टेटची देखरेख करण्यासाठी पद्मा नदीवर असलेल्या पद्मा नावाच्या बोटीमध्ये राहात आणि प्रवास करत. तेथूनच त्यांनी आपल्या महाराष्ट्रात असलेल्या या पुतणीला पत्रे लिहिली. ही सगळे पत्रे इंदिरादेवींनी जपून ठेवली आणि नंतर आपल्या स्वतःच्या हस्ताक्षरात ती लिहून काढली आणि आपल्या काकांना म्हणजेच रवींद्रनाथांना ती भेट दिली. रवींद्रनाथांनी या पुस्तकाला या पत्रांवर भाषेच्या दृष्टीने काही संस्कार करून ती पत्रे सामान्य वाचकांसाठी प्रकाशित केली. या पत्रांमधील काही कौटुंबिक उल्लेख गाळून टाकले आहेत. त्याचप्रमाणे भाषेच्या दृष्टीनेही काही पत्रांचे पुनर्लेखन केले असल्यामुळे या पत्रांना छिन्नपत्रे असे म्हटले जाते. यातील जवळपास प्रत्येक पत्रातून त्यांचे निसर्गप्रेम व्यक्त झाले आहे.

शिलाईदह येथून १७ जून १८९२ या दिवशी इंदिरेला लिहिलेले एक सुंदर पत्र आपण इथे पाहू या. पत्रातून त्यांच्यातील निसर्गप्रेमी तर दिसतोच पण तो निसर्ग त्यांना कशाप्रकारे प्रेरणा देत होता आणि त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करीत होता हेही आपल्याला बघायला मिळतं. आपल्यासाठी देखील हे पत्र खूप मार्गदर्शक आहे असं मला वाटतं.

प्रिय इंदिरा, आजकाल मी संध्याकाळच्या सुमाराला किनाऱ्यावर उतरून बराच वेळ फिरतो. पूर्वेला वळल्यावर एक सुंदर दृश्य दिसतं. पश्चिमेला वळल्यावर दुसऱ्या प्रकारचं दृश्य दिसतं. आकाशातून माझ्या माथ्यावर जणू सांत्वनाची वृष्टी होत राहते. माझ्या दोन्ही डोळ्यांमधून स्वर्गमय मांगल्याची एक धारा माझ्या अंतरंगात प्रवेश करत असते. या वाऱ्यात, आकाशात आणि प्रकाशात प्रतिक्षणी माझ्या मनातून जणू नवीन पालवी फुटते. मी नवीन प्राणाने आणि बलाने परिपूर्ण होऊन जातो. संसारातील सगळी काम करणं आणि लोकांशी व्यवहार करणं मला आता अगदी सहज वाटतं. खरंतर सगळंच सोपं असतं. एकच सरळ रस्ता असतो. तोच धरून चाललं की झालं. नाना प्रकारचे शॉर्टकट्स डोकं लढवून शोधण्याची मला गरज वाटत नाही. सुखदुःखं सगळ्याच मार्गांवरती असतात. कुठल्याही मार्गावर त्यांना टाळण्याचा उपाय नसतो. पण शांती केवळ या मोठ्या रस्त्यावरच असते.

(क्रमशः)

# वास्तव आणि श्रध्देची गाथा : साने गुरुजींची जीवनगाथा




ग्रंथ परिचय



प्रा.बी.एन.चौधरी.
धरणगाव जि. जळगाव.
(९४२३४९२५९३)

ज्योतिर्मय साहित्य

पू. साने गुरुजी यांच्या जीवनावर अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचं जीवन मांडणारे अनेक चरित्र देखील आहेत. परंतु, राजा मंगळवेढेकर यांनी लिहिलेलं ''साने गुरुजींची जीवन गाथा'' हे गुरुजींचं समग्र चरित्र आहे. या चरित्रामध्ये राजा मंगळवेढेकर यांनी गुरुजींच्या जीवनाचा गाभा आणि त्यांच्या एकूण कार्याचा परिघ मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. गुरुजींची जी काही धडपडणारी मुलं होती त्यापैकी राजा मंगळवेढेकर हे एक आहेत. त्यामुळे त्यांना गुरुजींचे प्रत्यक्ष सानिध्य लाभले. त्यांच्या विचारांनी ते प्रेरित झाले आणि त्यांनी स्वतःला गुरुजींच्या कार्याला वाहून घेतले. गुरुजी असेपर्यंत ते त्यांच्यासोबत होतेच परंतु गुरुजी नसतांनाही त्यांनी गुरुजींचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे. त्यांनी लिहिलेले गुरुजींच्या चरित्राची ही पाचवी आवृत्ती आहे. त्यामुळे यातील लिखाणाला वास्तवाचा स्पर्श आहे. श्रद्धेची किनार आहे आणि प्रबोधनाचा वारसा आहे ! ज्यांना ज्यांना पू. साने गुरुजी यांच्या जीवनाबद्दल व्यापक स्वरूपात जाणून घ्यायची इच्छा असेल, त्या प्रत्येकाने ''साने गुरुजींची जीवन गाथा'' हे चरित्र वाचायलाच हवे .

विनोबा भावे यांनी लिहिलेल्या मृत्यू लेखाने पुस्तकाची सुरवात होते. जो त्यांनी साने गुरुजींच्या मृत्यूनंतर दुसऱ्या दिवशी लिहिला होता. त्यानंतर आहे सुप्रसिद्ध साहित्यिक नरहर कुरुंदकर यांनी केलेली गुरुजींच्या साहित्याची साक्षेपी चिकित्सा करणारा ''साने गुरुजींचे साहित्य'' हा लेख. या दोन लेखांनी हे आत्मचरित्र उजळून निघाले आहे. नंतर सुरु होतं गुरुजींचं चरित्र. जे एकूण ४ कालखंडात विभागले आहे.

कालखंड १ : १९९९ ते १९२४ यात कुळकथा, जडण घडण, दापोलीतली चार वर्षे, औंधमधील सहा महिने, पुण्यास आगमन, महाविद्यालयीन काळ, तत्त्वज्ञान मंदिरात हे विषय आहेत.

कालखंड २ : १९२५ ते १९३० यात साने सर, छात्रानंद, जीवनस्पर्शी शिक्षक, अभिनव उपक्रम, ध्येयस्वप्नाच्या दिशेने, उजाडले हे विषय आहेत.

कालखंड ३ : १९३१ ते १९४० यात नवी पहाट, त्रिचनापल्लीच्या कारागृहात, सेवेच्या क्षेत्रात, पुनश्च कारावास, वैयक्तिक सत्याग्रह, पुणे, खानदेश, पुणे, खेड्यातली काँग्रेस, निवडणुकीच्या रणांगणात, सोन्या मारुती, नव्या आघाडीवर, पहिला लढा, काँग्रेस, टोल टॅक्स प्रकरण, ऐरणीवरील प्रश्न, किसान मोर्चा, त्रिपुरी आणि नंतर, काँग्रेसवर गंडांतर हे विषय येतात.

कालखंड ४ : १९४१ ते १९५० यात विचारयात्रा, बेचाळीसच्या क्रांतीत, ऑगस्ट क्रांतीचे संकीर्तन, वाङ्मयीन वादळ, विविध घटना, मंदिर प्रवेश, कर्तव्याची हाक, साधनेचा संसार, आंतरभारती, अखेरचा अध्याय, गुरुजींचे आत्मसमर्पण, समारोप. या समारोपानंतर काही परिशिष्ट जोडली आहेत. जी अभ्यासकांच्या, रसिकांच्या मनातील अनेक कुट प्रश्नांची उकल मांडतात. ज्यात अखेरची पत्रे, पालगडचे बहिष्कार प्रकरण, काही टिपणे इत्यादी, एक पत्र, साने गुरुजींचे साहित्य, साधनाकडून आलेली गुरुजींची पुस्तके, साने गुरुजींचा संक्षिप्त जीवनपट यांचा समावेश आहे.

गुरुजींचे बालपण ते त्यांच्या अंतिम श्वासापर्यंतचा जीवन प्रवास उलगडताना लेखकाने त्यांचे जीवन दोन टप्प्यात विभागले आहे त्यांच्या जीवनाची पहिली पंचवीस वर्ष व्यक्तिगत जडणघडण आणि जीवन विषयक दृष्टिकोनाच्या बांधणीत गेले आणि उर्वरित पंचवीस वर्ष त्यांनी स्वतःला सर्वस्वी सार्वजनिक कार्यात वाहून घेतले होते. सार्वजनिक जीवनात वावरत असताना त्यांच्यातला लेखक, शिक्षक, साहित्यिक, संपादक, अनुवादक आणि स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिक असे वेगवेगळे पैलू निखरत गेले. गुरुजींच्या सानिध्यात आलेल्या माणसांच्या आठवणी, अनुभव, मुलाखती तसेच गुरुजींची पुस्तकं, लेख, पत्रव्यवहार, डायऱ्या या माध्यमातून हे चरित्र साकारले आहे. यातील कोणतेही पान उघडले आणि वाचायला सुरुवात केली की वाचक त्यात गुंतून पडतो आणि तो राहिलेली मागची पुढची सर्व पान वाचून काढतो. हेच लेखकाचे यश आहे. लेखकाची भाषा साधी, सोपी, सरळ आणि थेट काळजाला भिडणारी असल्यामुळे राजकारणातील काही बोजड विषय देखील आपल्या आकलनाच्या क्षमतेपर्यंत सहज पोहोचतात. गुरुजींच्या जीवनावर रामकृष्ण, रवींद्रनाथ आणि गांधीजी यांचा खूप मोठा प्रभाव होता. ते त्यांना त्रिदेवताच मानत. या तिघांचा अंश त्यांच्या ठाई होता असं विनोबाजी म्हणतात. गुरुजींना समाजवादी म्हणण्यापेक्षा ते समाजसेवी होते. म्हणूनच, विनोबाजी त्यांना आधुनिक संत असं म्हणतात आणि त्यांना अमृतस्य पुत्रा अशी पदवी बहाल करतात.

गुरुजींनी अपार साहित्य लिहून ठेवले आहे. त्यात वैचारिक, कथा, कादंबरी, गीत आणि अनुवाद यांचा समावेश होतो. गुरुजींचे साहित्य हे रडके साहित्य होते असा एक आक्षेप त्यांच्यावर घेतला जातो. तो नरहर कुरंदकरांनी आणि पु ल देशपांडे यांनी जोरकसपणे खोडून काढला आहे. ते या पुस्तकात वाचायला मिळते. गुरुजींचे साहित्य हे दुबळे बनवणारं नाही तर उदात्तेचा विनम्र स्वीकार करायची शिकवण देणारे साहित्य होतं. ते त्याग, समर्पणाची शिकवण द्यायचं म्हणून हे साहित्य वाचून एक पिढी प्रत्यक्ष स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाली. गुरुजींचे साहित्य वाचून इंग्रजांच्या मार खाण्याची हिंमत वाचकांमध्ये आली. जेलमध्ये जाण्याची तयारी वाचकांची झाली. हे त्यांच्या साहित्याचेच यश नाही काय ? मग त्यांचे साहित्य रडके कसे ? त्यांचं साहित्य सामर्थ्याची शिकवण देणारं होतं. म्हणून ते समर्थाचे रडणे होतं, असं समर्पक भाष्य कुरुंदकर करतात. गुरुजींच्या साहित्यात दया, करुणा, प्रेम, माया होती. ते भेद्रवायच साहित्य नव्हतं तर संकटात सापडलेल्याला हिमत देणारं साहित्य होतं. गुरुजींचे साहित्य पळपुटेपणाचं, तडजोडीची, लबाडीचं. लाचारीचं, दिनपणाचं साहित्य नव्हतं तर ते आत्मक्लेषाचं, करुणेचं, कर्तव्यनिष्ठतेचं, साहित्य होतं. म्हणून, त्यांच्या साहित्याला मराठी भाषेतच नव्हे तर जागतिक पातळीवर देखील गौरविले गेले. गुरुजींनी अनुवादित केलेले साहित्य पाहिले तरी त्यांच्या वैचारिक वैश्विकतेची कल्पना येते. कुर्ला, हार्ड, विक्टर ह्युगो या जगप्रसिद्ध लेखकांचे साहित्य त्यांनी अनुवादित केलं आणि त्यातील जीवनातील कटू वास्तव, सुखदुःख नेमकेपणाने उलगडून दाखवली. त्यांच्या साहित्यात स्नेहभाव, सेवा, सौंदर्य, प्रेम जीवनातील उदात्तते समोर विनम्र होणं आणि भारतीय संस्कृती याला विशेष महत्त्व होते. त्यांचे साहित्य कितीही वैचारिक वाटत असले तरी त्याला भावनात्मकतेचा एक परिसस्पर्श होता. त्यांच्या साहित्यात भावनेची सूक्ष्मता, कल्पनाविलास आणि प्रबोधनाचे विचारच डोकावत. हे सार लेखकाने अतिशय सुलभ, सोप्या आणि समर्पक भाषेत मांडलेलं आहे. त्यामुळे वाचकाला गुरुजीचे अंतरंग उलगडत जाते.

गुरुजींच्या व्यक्तिमत्वात शांती आणि अशांती या दोहोंचाही समन्वय होता. त्यांची शांती ध्येयावरच्या असीम श्रद्धेतून जन्मलेली होती; आणि अशांती ध्येय मांगल्याच्या परिपाकातून उद्भवलेली होती. म्हणूनच, ते शांत असूनही अशांत होते. ही अशांतीच त्यांना कधी निराश बनवीत असे, तर कधी आशावान व प्रसन्नही ठेवत असे. कधी निवृत्तीकडे त्यांची पावले वळवीत असे, तर कधी कर्मशून्यतेतून प्रवृत्त करुन कार्यप्रवण ठेवत असे. त्यांच्या जीवनाचे हेच संजीवन सूत्र होते. गुरुजी आपल्या एका पत्रात म्हणतात, मी जीवनाचा एक नम्र उपासक आहे. सभोवतालचा सारा संसार सुखी आणि समृद्ध व्हावा, ज्ञानविज्ञान संपन्न कलामय व्हावा, संस्कृती संपन्न आणि प्रेमळ व्हावा हीच एक मला तळमळ आहे. माझे लिहिणे व बोलणे, माझे विचार व माझी प्रार्थना या एकाच ध्येयासाठी असतात. किती ही निर्मळता आणि उदात्तता. तीच आपण या चरित्रातून अनुभवू शकतो. त्यासाठी एकदा हे चरित्र संपूर्ण वाचायलाच हवे. ''साने गुरुजींची जीवन गाथा'' हे आत्मचरित्र साधना प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. यात ६८५ पृष्ठ असून मुल्य ८००/-रु मात्र आहे. मित्रांनो, पुरुष असूनही माऊली हा सन्मान जगात फक्त तिघांनाच प्राप्त झाला आहे. देवांमध्ये पांडुरंग माऊली. संतांमध्ये ज्ञानेश्वर माऊली आणि शिक्षकांमध्ये साने गुरुजी माऊली. माऊलीचं हृदय घेवून जगाला प्रेम अर्पण करणारा हा मानवतेचा यात्री म्हणजे आधुनिक संतच होता. त्यांचं चरित्र नव्या पिढीपर्यंत जायलाच हवे.



## विजय जोशी यांच्या बाया या मराठी कवितेचा ५६ भाषांमध्ये अनुवादाचा जागतिक विक्रम

ज्योतिर्मय साहित्य


**डोंबिवली** – प्रदीप बडदे दि.१५ जून २०२५ रोजी डोंबिवली येथे वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाचे प्रतिनिधी चीफ एडिटर सुष्मा नार्वेकर आणि मार्केटिंग हेड संजय नार्वेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन कवी विजो यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित अनुवादकांनाही सन्मानित करण्यात आले.

या ५६ अनुवादित भाषांमध्ये ३४ बोलीभाषा, १५ प्रादेशिक भाषा, ७ जागतीक भाषा आहेत. (यामध्ये मोडी आणि ब्राम्ही लिपी यांचाही समावेश आहे हेही विशेष). अजूनही इतर भाषांमध्ये अनुवाद येत आहेत.

मराठी भाषा अभिजात म्हणून घोषित झाली असतानाच एखाद्या मराठी कवितेला एवढ्या मोठ्या संख्येने अनुवादाच्या सहाय्याने जागतिक पटलावर पोहोचविण्याचे महत्वाचे काम झाले आहे, याबद्दल वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींनी कौतुक केले.

## सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था नियामक मंडळ सदस्यपदी नितीन वैद्य

ज्योतिर्मय साहित्य



**पुणे** – पुणे येथील एअर व्हाईस मार्शल नितीन शंकर वैद्य VSM (निवृत्त) यांची महाराष्ट्र शासनाने पुढील पाच वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर येथील (सर्विसेस प्रेपॅटरी इन्स्टिटयूट -SPI ) सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थाच्या नियामक मंडळ सदस्य पदी नियुक्ती केली आहे.


एअर व्हाईस मार्शल नितीन वैद्य (निवृत्त) हे पुणे येथील रहिवासी असून अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याचे उपाध्यक्ष आहेत.अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद ही पंजीकृत व केंद्र सरकार मान्यताप्राप्त पूर्व सैनिकांसाठी, वीर पत्नी, वीर माता यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय स्तरावर भरीव कार्य करणारी लष्कर, नौदल व वायुदल सेवानिवृत्त सैनिकांची समाजभान जपणारी संस्था आहे.

नितीन वैद्य यांच्या ह्या नियुक्तीबद्दल पूर्व सैनिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.



## इंदापूरी निखारे

## मर्मबंधातील ठेव...



ज्योतिर्मय साहित्य

जगत असतांना...
कुठलीतरी एखादी घटना...
एखादा क्षण...
मनात रुतून बसलेला...
मर्म बंधातल्या ठेवी सारखी नसेल...
तशी ती इतरांच्या दृष्टीने...
अतिशय किरकोळ किंवा हास्यास्पद...
पण तरीही त्या घटनेचे, क्षणाचे महत्व...
त्याच्या आनंदाने जगण्यासाठी...
ते सगळ्यांना कळले पाहिजे असेही नसते...
ती फक्त ज्याच्या त्याच्या मानसिक समाधानासाठी...
तो लहान असतांना...
त्याच्या मित्राची आई...
काश्मीर, लेह, लडाख भागात...
टूर कंपनी बरोबर...
काश्मीर मध्ये एका दरीत...
कोसळून... त्या बर्फच्या दरीत...
ती सापडलीच नाही... काही वर्षे गेली पण...
तो मोठा झाला...
वडिलांनी व्यवसाय त्याच्या स्वाधीन केला...
वडील त्याला म्हणाले...
मी काश्मीरला फिरायला जातो...
नको, असे मुलगा म्हणाला...
पण वडील म्हणाले...
फक्त त्या पॉईंट वर जाणार...
जिथे तुझी आई...
शक्य तेव्हढा विरोध केला...
पण वडीलांनी जायचच असे ठरवले...
ते निघाले...
तो त्यांना सोडायला रेल्वे स्टेशनवर...
आईची आठवण... ती घटना...
दोघेही मनात येणाऱ्या भावनांना...
चेहऱ्यावर दिसू नये याचा...
शक्य तेव्हढा प्रयत्न करत होते...
आठ दिवस झाले... त्याला फोन आला...
वडील दरीत पडून...
अजून बॉडी मिळाली नाही...
आणि बहुतेक... अमुक तमुक, वगैरे वगैरे...
कारणे एकाखाली एक... ठिकाण तेच होते...
जे दोघांनाही माहित होते...
आई गेल्यावर दोघे तेथे गेले होते... जेथे आई...
सर्वांना बातमी समजते...
नातेवाईक, मित्र, जवळचे...
काश्मीर विषय... पण वेगळ्याच दुःखात...
आईवडिलांचे एकमेकांवर अतूट प्रेम...
एकाच जागी... एकाच ठिकाणावर...
अतृप्त आत्मा वगैरे पण... धार्मिक विधी, परंपरा...
१५ दिवस होऊन जातात... तो मोठा झाल्यावर...
कोणीतरी त्याला म्हणाले होते.. काय म्हणाले होते?
ते त्याने कोणालाच कळू दिले नव्हते...
त्याचा प्लॅन मात्र यशस्वी झाला होता...
वडिलांना बरोबर त्याच ठिकाणी...
कोणालाच संशय आला नाही...
ती अजून एक मर्मबंधातील ठेव...
कोणालाच कळणार नव्हती...



# मराठी गझलेचे अवकाश समृद्ध करणारा - एकपक्षी

ज्योतिर्मय 📖 साहित्य

माझे मित्र सतीश मालवे ह्यांचा ''एक पक्षी'' संग्रह प्रकाशित झाल्यापासून वाचायची खूप इच्छा आणि आतुरता होती. वाचनास सुरूवात करताच साजेसे मुखपृष्ठ दिसले. शीर्षकास अनुसरून असणाऱ्या मुखपृष्ठाने संग्रहातील आशयाची कल्पना आली आणि संग्रह वाचण्याची उत्सुकता वाढली. संग्रहातील गझल वाचताना खूप आनंद वाटला. संग्रह वाचल्यानंतर मी माझा प्रामाणिक अभिप्राय नोंदवत आहे..

मातीशी नाळ टिकवून ठेवणारा, नात्यांतील ओल जपून ठेवणारा, शोषिकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा, कामगारांच्या संघर्षाची मांडणी करणारा, स्त्री जाणिवांची दखल घेणारा, गावाची महिमा गाणारा, मैत्रीचा धागा घट्ट विणणारा, समाजातील प्रश्नांवर व्यक्त होणारा आणि स्वतःच्या पंखांवर प्रचंड विश्वास असणारा ''एक पक्षी'' आत्मविश्वासाने भरारी घेतो आणि आपल्या लेखणीच्या बलवान पंखांनी सारं अवकाश काबीज करतो. तो पक्षी म्हणजे कवी, गझलकार सतीश गुलाबसिंह मालवे. एक तरुण तडफदार, संवेदनशील लेखन करणारा गझलकार.

तो आला, त्याने पाहिलं आणि त्याने सारं जिंकूनही घेतलं असं काहीसं सतीश मालवे ह्यांच्याबाबतीत झाले आहे. एक तरुण कवी गझलेच्या प्रेमात पडतो, तिची साधना करत करत गझल क्षेत्रात आपली छाप सोडून जातो.दर्जेदार लेखना बरोबरच, माणूस म्हणूनही आपली प्रतिमा जपता येणे अवघड असते,पण हा समतोल सतीश जी साधताना दिसतात.

रोजच्या जीवनातील खयाल, शेरांना अनुभवाची किनार, विचारात नाविन्य, बोलकी वाक्यरचना, साध्या शब्दांचा वापर, सोपी वाक्य रचना, इतरांच्या प्रभावात न गुंतणारी स्वतंत्र लेखनशैली, तंत्र शरण न जाता आशय संपन्नेतकडे जाणारे लेखन,सामाजिक मूल्ये जतन करणे,संस्कृती संवर्धन करणे तसेच संस्कारक्षम लेखन इत्यादी वैशिष्ट्ये सतीश मालवे ह्यांच्या गझल लेखनात प्रामुख्याने दिसून येतात.

सतीश जी ह्यांचे शेर बहूआयामी आहेत, त्यांच्या शेरांना अद्भुततेची चमक आणि अनुभवाची धार लाभली आहे.हा गझलकार सच्चा लिहितो, म्हणून त्यांचा शेर सर्वांना अच्छा वाटतो. ''एक पक्षी'' संग्रह वाचत असताना गझलेत नाटकीपणा, शब्दांचा भडीमार, ओढून ताणून आणलेली काफियांची गर्दी दिसून येत नाही.एक पक्षी संग्रहातील शेरांची भाषा बोलकी आहे, स्पष्ट आणि मनाला भिडणारी आहे.ह्या संग्रहातील शेर सार्वभौम आहेत. जगातील लोकांच्या अनुभवाशी साधर्म्य सांगणारे लेखन ह्या संग्रहात दिसून येते. केवळ प्रश्नांवर बोट न ठेवता, थंड डोक्याने त्यावर उत्तरे शोधताना सतीश जी ह्या संग्रहाच्या माध्यमातून दिसून येतात. म्हणूनच सतीशजींची गझल सर्व सामान्यांची गझल म्हणून पुढे येते.

त्यांच्या गझलांच्या शेरात आलेल्या काही ठळक जाणिवा,वैशिष्ट्ये,प्रतिमासृष्टी ह्यांचा थोडक्यात आढावा..

१) बाप : प्रत्येक कवी आपल्या बापावर व्यक्त होत असतो.बाप म्हणजे कवीची हळवी जागा.बापा विषयी व्यक्त होताना सतीश जी लिहितात.

सोसून झळ उन्हाची दाणे टिपून येतो
दिसतो मला निरंतर बापात एक पक्षी.
बाप इकडे साफ करतो शासकी मोऱ्या
आणि मुलगा आमदारासारखा फिरतो.

२)प्रतीकांचा सुयोग्य वापर: सतीश मालवे ह्यांच्या गझलेतील एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रतीकांची अचूक निवड.ह्यांच्या गझलेतील प्रतीके बोलकी असतात,समर्पक असतात आणि हटके असतात.ही प्रतीके गझलांना साज चढवताना दिसतात.याचेच एक उदाहरण,


दशा माझ्या मनाचीही समुद्रासारखी व्हावी
मनापासून एखादी नदी भेटून गेल्यावर.

३) संघर्ष : सतीशजींच्या गझलेत वेळोवेळी संघर्ष दिसून येतो.सामान्य लोकांच्या जीवनात जो असतो तो संघर्ष. पोटा पाण्यासाठी शहरात येऊन केलेला संघर्ष, संसार फुलवण्यासाठी केलेला संघर्ष, मनातील भावभावनांचा संघर्ष, समाजातील व्यवस्थेविरुद्ध केलेला संघर्ष इत्यादी विषयी सतीशजी गझलेतून व्यक्त होताना दिसतात.

किती विजांशी आधी लढला होता
नंतर कोठे तो कोसळला होता.
ओझे त्याला ओझे वाटत नाही
कारण त्याने भार पेलला होता

४) जबाबदारीची जाणीव: सतीश मालवे ह्यांच्या गझलेत जबाबदारीची जाणीव दिसून येते. मुलगा हा नात्याने,पती ह्या नात्याने, बाप ह्या नात्याने, कामगार ह्या नात्याने, मित्र ह्या नात्याने, कवी ह्या नात्याने सतीशजी त्यांच्या सोबत साऱ्या सामान्य लोकांच्या जबाबदाऱ्या गझलेतून मांडताना दिसतात.

फुलाप्रमाणे जगवायची इच्छा झाली तेव्हा







का काट्यांनी चोहीकडुनी गस्त घातली आहे?

५) आशावाद पेरणारी गझल: सतीशजी ह्यांची गझल कमालीचा आशावाद पेरते.संकट समोर असताना हातावर हात ठेवून बसण्यापेक्षा जिद्द,चिकाटीने त्यास सामोरे जाणारी ह्यांची विचार शैली ह्या रचनांमधून पहायला मिळते.

पर्वतांनो आडवे येऊ नका
मार्ग माझा काढणे जमते मला.
येईल का दऱ्यांचा अंदाज आपल्याला
या जीवनात आला जर चढ उतार नाही.
मी जरीही पायथ्याशी राहतो आहे
मी चढू शकतो तुझ्यावर डोंगरा आता.
येवोत कोणतेही अवघड प्रसंग आता
हत्यार मी बनवले आहे भयास माझ्या
कधीचे अंबराला सांगतो आहे
फुटू दे पंख..मग उडणार आहे मी.

६) वास्तवाचे भान जपणारी गझल : सतीश मालवे ह्यांची गझल म्हणजे हवेत इमले बांधणारी गझल नव्हे, तर वास्तवाचे भान जाणणारी आहे. जे आहे ते दाखवणारी गझल सतीशजी लिहितात. विदेशात जाऊन ,बक्कळ पैसा कमावणाऱ्या आणि देशाला विसरलेल्या तरुणांना उद्देशून ते लिहितात.

मायभूमीची कुणाला ओढ नसल्याने
प्राण तळमळतो कुणाचा सागरा आता

स्पष्ट आणि थेट अधिकारवाणीने बोलणारी त्यांची गझल आपली वाटते.

लख्ख आधी कर चराचर
मग स्वतःला म्हण प्रभाकर
काय दाखवशील तू रस्ता मला
बांधली पट्टी तुझ्या डोळ्यांवरी

७) वेगळी शैली : कुणाच्याही प्रभावात न येता स्वतःची वेगळी शैली सतीश ह्यांनी जपली आहे . ह्याविषयी व्यक्त होताना ते लिहितात.

मला वेगळेपण जपू द्या स्वतःचे
नका येत जाऊ प्रभावात माझ्या

८) अनुभवाची किनार : सतीशजींच्या गझलेतील शेर अनुभवाची किनार घेऊन जन्मास येतात.जसे,

एक मुलगा कामधंदा शोधतो आहे
एक मुलगा काम नसल्यासारखा फिरतो
शहरामधे राहूनही जपतात माणुसकी किती
शहरात गावासारखी असतात काही माणसे
अंधार दूर होतो सूर्या तुझ्यामुळे.. पण !
माझी पहाट झाली पाटी नि पुस्तकाने
तुझ्या जीवनाची कथा वाचली
तशी हुंदक्यांची गती वाढली

९) विरोधाभासातून वास्तविकतेकडे नेणारी गझल: सतीश मालवे ह्यांचा गझलेतील मिसरे विरोधाभास दाखवतात त्याच वेळी वास्तविकतेचे दर्शनही घडवतात.उदाहरणासाठी खालील शेर वाचावा.

झोपडी पाहिल्यावरी माझी
एक वाडा दुखावला होता

सतीशजी ह्यांच्या गझलेत त्याग भावना दिसून येते.त्यातूनच प्रेरणादायी ओळी जन्मास येतात.

मन लगोलग कुठे कमळ बनले
देह चिखलात ठेवला होता

१०) वेगळ्या खायालांचा धनी: सतीश ह्यांची गझल वेगळी आहे.खयालांचे वेगळेपण त्यांच्या गझलेत दिसून येते.तोच तो पणा दिसून येत नाही. हे सांगताना ते स्पष्ट करतात.

वैशिष्ट्य या गझलचे एवढेच की
सगळे खयाल जगण्यातून घेतले
तुला आश्वासनांवर ठेवतो आहे
जरा समजून घे सरकार आहे मी

११) आयुष्याला दुनियादारी शिकवणारा गझलकार: सतीश जी आयुष्यालाच दुनियादारी शिकवतात. आयुष्याची समजूत घालताना ते लिहितात,

जो जन्मला त्याचे मरण सुद्धा अटळ आहे
आले न कोणीही अमर होण्यास आयुष्या

१२) व्यथा, दुःख, वेदनेचा गौरव करणारा कवी: सतीश ह्यांचा गझलेच्या शेरांतून मानवी व्यथा, दुःख, वेदनेचा दुखवटा साजरा केला जात नाही तर ते ह्या भावनांची ओटी भरतात, त्यांचा गौरव करतात.

पिकल्यात काळजाच्या शेतात वेदना
वाटू कशा तुम्हाला फुकटात वेदना
दिसतो वरून अवघा मी कोरडा जरी
आतून ओल मजला देतात वेदना
आधी व्यथा सोसून घे बाकी बघू पुढचे पुढे
दुःखास कवटाळून घे..बाकी बघू पुढचे पुढे

मराठी गझलेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाने हा संग्रह वाचावा आणि संग्रही ठेवावा असा झाला आहे. या संग्रहात एकूण ९० गझलांची मेजवानी वाचकांना मिळणार आहे.गझल मंथन प्रकाशन संस्थेने देखणा संग्रह वाचकांच्या हाती दिला आहे.ह्या संग्रहाचे स्वागत मूल्य २०० रुपये असून. हा संग्रह ऑनलाईन उपलब्ध आहे.स्वतः गझलकार सतीश मालवे किंवा गझल मंथन प्रकाशन संस्थेद्वारे आपण मागवू शकता. संग्रहासाठी सतीश मालवे यांचा संपर्क (९५२७९१२६२५) यावर आपण मॅसेज किंवा कॉल करावा.

सतीश मालवे लिखित एक पक्षी ह्या गझल संग्रहाला वाचकांचे प्रचंड प्रेम लाभावे, ह्या संग्रहास गझल क्षेत्रातील अनेकविध सन्मान मिळावेत.सतीश मालवे ह्यांची प्रतिभाशक्ती उत्तरोत्तर बहरत जावी, अशी प्रार्थना ईश्वर चरणी करतो. सतीश मालवे आपणास पुढील दैदिप्यमान प्रवासासाठी अनंत शुभेच्छा.


***

## शिक्षणात वेगवेगळे प्रयोग करणं गरजेचं?

ज्योतिर्मय 📖 साहित्य

पुर्वीही शेतकरी हा सुखी नव्हता. कारण तो अशिक्षीतच होता व त्याला लुटणारा सावकार हा शिक्षीत घटक असल्यानं त्यानं आपली चतुराई लावून कित्येक शेतकऱ्यांकडून त्यांच्या जमीनी विकत घेतल्यात.

शिक्षण क्षेत्रात अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया घडत असतांना शिक्षक नावाचा घटक हा जास्त मेहनत करीत असतो. तो शिकलेला असतो. परंतु त्याचं शिक्षण हे कमी झालेलं असतं. त्यातच त्याचेवर लक्ष ठेवून असलेला घटक अर्थात अधिकारी वर्ग हा जास्त शिकलेला असतो. त्यानंतर साहजीकच शिक्षकांवर अत्याचार होणारच. जोही अधिकारी येईल वा मंत्री येईल. तो सर्वांनाच आपलं शहाणपण साःगून जातोच. अशी शिक्षकांची अवस्था. शिक्षण हा गुलामच आहे या सर्व प्रक्रियेतील. त्याचेवर अत्याचार होत असला तरी तो काहीही बोलत नाही. प्रसंगी आत्महत्या करतो एक चिठ्ठी लिहून. परंतु परिस्थिती विरोधात तो कुठेही दाद मागू शकत नाही. मात्र त्याचेवर जरी अत्याचार होत असेल, तरी तो आपल्या कर्तव्याप्रती इमानदार असतो. तो आपल्या विद्यार्थ्यांना आपलं मुल मानून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी धडपड करीत असतो. अन् तसे करीत असतांना तो नाविन्यपूर्ण मार्ग वापरुन आपल्या विद्यार्थ्यांना सकस ज्ञान देत असतो. यालाच नवोपक्रम म्हणता येईल. शिक्षक असाच आपल्या विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी नवीन असा उपक्रम हाती घेतो. ज्यातून विद्यार्थ्यात थोड्याफार प्रमाणात का होईना, बदलाव करता येतो. शिक्षणात तसं पाहिल्यास नवनवीन प्रयोग वा उपक्रम करणे गरजेचे आहे. कारण तसे उपक्रम केले गेले नाही तर विद्यार्थी घडणार नाही. शिवाय शिकत असतांना पूरयोगासारख्या कृती करुन विद्यार्थ्यांना शिकविल्यास ते विद्यार्थ्यांना चांगलंच लक्षात राहातं. त्याचं कारण आहे कृतीयुक्त शिक्षण. आज याच कृतीयुक्त शिक्षणाची गरज आहे की जे शिक्षण विद्यार्थ्यांच्या सहज लक्षात राहू शकते. परंतु हे जरी खरं असलं तरी आजची परिस्थिती शिक्षकांच्या विचारांना चालना देणारी नाही. त्याच्या मनात वेगवेगळे विचार येतात. असे विचार नवोपक्रमाला चालना देतात. त्यानं जर नवोपक्रम करतो म्हणलं तर त्याला अडविणारे संस्थाचालका सारखे घटक शाळेत आहेत. महत्वाचं सांगायचं म्हणजे नवोपक्रम हा अतिशय चांगला उपक्रम असून त्यातून संशोधनाची वृत्ती वाढीस लागते. ज्यातून एखादा संशोधकही तयार होवू शकतो. जो संशोधक देशाच्या उभारणीसाठी व देशाला महासत्ता बनविण्यास सहाय्यक ठरु शकतो.





## मृत्यू एकदाच येतो - अशफाक उल्ला खान

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**(मागील अंकावरून)**

१८५७ च्या गदर युद्धात आजोळच्या लोकांनी तेव्हा भारताच्या स्वातंत्र्यासाठी साथ न दिल्याने इतर जनतेने रागाच्या भरात त्यांचा अलिशान बंगला आगीत भस्म करून टाकला. तो बंगला त्या शहरात आजही 'जली कोठी' या नावाने प्रसिद्ध आहे. अशफाक यांनी आपले बलिदान देऊन त्यांच्या आजोळच्यांच्या नावावरील कुरूप डाग कायमचं धुवून टाकला.अशपाक त्यांच्या पाच भावंडांमध्ये सर्वात लहान. १९१८ मध्ये ते सातवीत असताना पोलिसांनी त्यांच्या शाळेवर छापा टाकून मैनपुरी कटाच्या संदर्भात राजाराम भारतीय या विद्यार्थ्याला अटक केली, ज्यामध्ये कार्यकर्त्यांना इंग्रज शासनाविरोधी साहित्याच्या प्रकाशनासाठी निधी हवा असल्याने मैनपुरीमध्ये लूटमार केली होती. अटकेमुळे शाळेतल्या विद्यार्थ्यांचा देशभक्तीमुळे चळवळीमधील सहभाग वाढला ज्यामध्ये अशफाक खान यांचा समावेश होता. सर्व भाऊ अशपाक यांना प्रेमाने ''अच्छू'' म्हणत असत. मैनपुरी लूटमारीपासून अशफाक यांचा भाऊ रियासत उल्ला यांनी त्यांना सांगितले कि, हल्ली पं. रामप्रसाद बिस्मिल शाहाजहानपूरमध्ये दिसत नाहीत. ते एक समर्थ व्यक्ती आणि उत्तम दर्जाचे कवीही आहेत. अशफाक तेंव्हापासूनच बिस्मिल यांच्या भेटीसाठी उतावळे झाले होते. १९२० मध्ये सार्वत्रिक माफीनंतर पं. रामप्रसाद बिस्मिल आपल्या शाहजहानपुरला आले. त्यांची अशफाक यांनी भेट घेऊन विश्वास मिळविण्याचा प्रयत्न केला. पण ते असफल झाले. एके दिवशी रात्री खन्नौत नदीच्या किनारी एका सुनसान जागेवर मीटिंग चालू होती आणि बिस्मिल यांच्या एका चारोळी (शेअर) ला अशफाक आमीन म्हंटल्याने त्यांनी त्यांना बोलावून परिचय करून घेतला. त्यांचा भाऊ रियासत उल्ला त्यांचा क्लासमेंट असल्याने त्या ओळखीने ते मातृ वेदनेचे सक्रिय सभासद होऊन त्यांच्या जीवनाची देशभक्त म्हणून क्रांतीकार्यास सुरवात झाली. असहकार, स्वराज पार्टी आणि हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशनशी संबंधित उपक्रमामध्ये रामप्रसाद बिस्मिल यांच्यासोबत ते सामील झाले. बिस्मिल आणि खान दोघेही कविता करीत असल्याने अनोखा अनुबंध त्यांच्यामध्ये निर्माण झाला. अशफाक हे हसरत या टोपणनावाने उर्दू कविता लिहित होते. हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशनमधील इतरांप्रमाणे अशफाक हे लेनिन आणि रशियातील बोल्शेविक क्रांतीने जोरदार प्रेरित होते.

१९२३ मध्ये शचींद्रनाथ संन्याल व योगेशचंद्र चॅटर्जी यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन ची स्थापना झाली यामध्ये अशफाक उल्ला खान आणि पं. रामप्रसाद बिस्मिल यांचा प्रमुख सहभाग होता. शचींद्रनाथ संन्याल आणि योगेशचंद्र चॅटर्जी यांनी व इतरांनी १९२५ च्या जानेवारी महिन्यात हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशनच्या वतीने देशभर रिव्हॅालशनरी () या नावाने एक पत्रक वाटण्यात आल्याने भारतभर ब्रिटिशांविरुद्ध असंतोष नागरिकांच्यामध्ये निर्माण झाला. या पत्रकाच्या सूत्रबद्ध प्रचाराने राजसत्तेला कल्पना येऊन तिची निद्रा खाडकन उतरली.क्रांतिकार्य उभे करण्यासाठी नुकतेच ज्वल जहाल पत्रके काढणे येवढेच उद्दिष्ट नसून ज्वलजहाल कृत्ये करणे हे उद्दिष्ट असल्याने तसेच क्रांतिकारक चळवळीत मुरलेलेच लोक संस्थेत असल्यामुळे बॉंबस तयार करणे व नवीन शस्त्रास्त्रे मिळविणे यात ते कुशल होते. पण त्यासाठी त्यांना आवश्यक तो धनसंचय मिळविण्यासाठी दरवडे घालणे हा एकच मार्ग उपलब्ध होता. तदनुसार रामप्रसाद बिस्मिल, रामकृष्ण स्वामी, चंद्रशेखर आझाद, अशफाक उल्ला खान, शचींद्र बक्षी व मन्मथनाथ गुप्त यांनी ९ मार्च १९२३ रोजी बिचपुरी येथे तसेच २४ मे १९२५ रोजी चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्ला खान, शचींद्र बक्षी,




मन्मथनाथ गुप्त व मुकुंदीलाल यांनी द्वारकापूर येथे साहसपूर्ण दरवडे घालून पक्षाची नड भागविली. इंग्रज सत्तेची या दरवड्यामुळे धावपळ सुरु झाली आणि ब्रिटिश विरोधी कारवाया केल्याच्या कागदपत्रांच्या आधारे हिंदुस्तान रिपब्लिक असोसिएशनचे नेते शचींद्रनाथ संन्याल आणि योगेशचंद्र चटर्जी यांना पकडून त्यांना २ वर्षांची शिक्षक ठोठावण्यात आली.

यानंतर या असोसिएशनने एक असें ज्वलंत साहस केले कि, क्रांतीकारक आंदोलन व त्यामागची विचारप्रणाली यांच्याकडे सर्व जनतेचे लक्ष आकृष्ट झाले ते म्हणजे काकोरी येथे रेल्वेगाडीवर हल्ला करून सरकारी धनकोश लुटला हे होय. असोसिएशनच्या नेत्यांना जहाजावरून गुप्त मार्गाने बराच शस्त्रसाठा मिळण्यासारखा होता पण शस्त्रे विकत घेण्यासाठी कित्येक सहस्त्रक रुपयांची आवश्यकता होती. यासाठी प्रथम संस्थेच्या सदस्यांनी आपली घरे धुवून काढली. पण साऱ्या निष्कांचनांजवळ निघणार काय विशेष? अशा कामाविषयी सहानुभूती असणाऱ्या लोकांकडून निधी गोळा करण्याचाही प्रयत्न केला पण त्याला फारसे यश आले नाही. शेवटी संधी जाऊ नये म्हणून रायबरेली जिल्ह्यातील सराय महेश नावाच्या गावात राजनैतिक दरवडाही घालण्यात आला पण आवश्यक तितके पैसे त्यातूनही उपलब्ध होऊ शकले नाहीत. शेवटी समितीच्या महत्त्वपूर्ण बैठकीत पं. रामप्रसाद बिस्मिल यांनी ठराव मांडून सरकारी पोस्ट ऑफिसचा रेल्वेतून नेण्यात येणारा खजिना लुटण्यास संमती मिळवली. समितीचे एक श्रेष्ठ नेते अशफाक उल्ला खान यांनी या ठरावाला प्रथम या दरवड्यामुळे क्रांतीकारक या प्रदेशात सक्रीयपणे प्रभावशाली काम करीत आहेत हे या गोष्टीमुळे प्रकट होईल व आपली परिपूर्ण सिध्दता झाल्यांवाचून राजसत्तेला असे जागरूक करणे आपल्या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीनेच अहिताचे आहे असे सांगत विरोध दर्शविला.पण मन्मथनाथ गुप्त प्रभूति लोकांनी त्याला विरोध केला. आणि शेवटी सर्वानुमते काकोरी स्टेशनजवळ साखळी ओढून गाडी थांबवावी व सरकारी पैशाच्या पिशव्या पळवाव्या या योजनेसाठी पं. रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्ला खान, राजेंद्र लाहिडी, शचींद्रनाथ बक्षी, मुकुंदीलाल, मन्मथनाथ गुप्त, मुरारी शर्मा, बनवारीलाल व चंद्रशेखर आझाद यांच्यावर जबाबदारी देण्यात आली. ९ ऑगस्ट १९२५ रोजी लखनौपासून सहशनपूरला जाणाऱ्या रेल्वे मार्गावरील आठ मैलावरील तिसरे स्टेशन असलेल्या काकोरी या ठिकाणी तिजोरी फोडण्याची साधने घेऊन या गाडीत सर्वजण बसले.या गाडीत रेल्वेच्या खजिन्याव्यतिरिक्त बंदुकीच्या पहा-यातून अजून एक खजिना जात होता. शिवाय या ट्रेनने काही इंग्रज सैनिकही सशस्त्र स्थितीत प्रवास करीत होते. एक इंग्रज मेजर सेकंड क्लास म्हणजे आजच्या फर्स्ट क्लास डब्यात होता. आपल्या दूतांकडून गाडीतील या सशस्त्र लोकांची उपस्थितीची माहिती मिळताच अशफाक उल्ला खान ने पुन्हा सर्वांना हे साहस न करण्याचे विनविले. पण ते तेजस्वी क्रांतीकारक आपल्या निश्चयापासून ढळण्यास तिळमात्र तयार नाहीत म्हंटल्यावर अशफाक, राजेंद्र लाहिडी, शचींद्रनाथ बक्षी हे दुस-या वर्गाच्या डब्यात व उर्वरित लोक पं. रामप्रसाद बिस्मिल यांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्या डब्यात बसले. या लोकांजवळ चार नवीन मौजेर पिस्तूल व काडतुसांचा भरपूर साठा होता. काकोरी स्टेशनवरून गाडी थोडी दूर गेल्यावर धोक्याची साखळी ओढून क्रांतीकारकांनी गाडी थांबवली आणि पैशाच्या थैली असलेल्या डब्यात शिरून तिजोरी खाली ढकलून दिली. पिस्तुल छातीवर रोखून गार्डला तोंड खाली करून जमिनीवर पालथे पडून रहाण्यास सांगितले. भक्कम तिजोरी फुटेना. अशफाक पहारा देत होता. व्यर्थ वेळ जात असल्याचे पाहून आपली पिस्तूल मन्मथनाथ गुप्तांच्या हातात देऊन आपल्या बलिष्ठ हातात घण घेऊन त्याने भीमप्रहार करत तिजोरी फोडली. क्रांतिकारक पैशाच्या थैल्या घेऊन त्या परिसरातील दाट झाडीत अंतर्धान पावले. रेल्वे गाडीतील मेजर, गोऱ्या शिपायांनी विरोध न करता आपापल्या डब्यात दारे लाऊन थांबणे पत्करले. वाटेत थैल्या उघडून त्यातील पैसे काढून लखनौ शहरात सावधपणे क्रांतीकारकांनी प्रवेश केला.




या साहसात त्यांना पाच सहस्त्र रुपये मिळाले. काकोरीच्या रोमांचकारी घटनेने ब्रिटीश राजसत्तेला जणू गदगदा हलवून जागे केले. दमनचक्रे अतिशय वेगानें फिरून चाळीस व्यक्तींना पकडण्यात आले. चंद्रशेखर आझाद, अशफाक खान व शचींद्र बक्षी फरारी झाले. २६ ऑक्टोबर १९२५ च्या सकाळी पं. रामप्रसाद बिस्मिला यास पोलिसांनी पकडले. अटक टाळण्यासाठी अशफाक खान नेपाळला पळून गेले. नेपाळहून ते कानपूर आणि नंतर डाल्टनगंजला गेले. आणि तेथे एका अभियांत्रिकी फर्ममध्ये लिपिक म्हणून टोपण नावाने काम करीत होते. अखेर अशफाक खानने आपल्या क्रांतीकारी कारवाया सुरू ठेवण्यासाठी दिल्लीला जाण्याचा निर्णय घेतला. दिल्लीत असताना त्यांनी आपल्या शाहजहांपूरमधील एका पठाण मित्राची गाठ घेतली. ज्याने पोलिसांना त्यांचा गुप्तपणे ठावठिकाणा कळविला. ७ डिसेंबर १९२६ च्या सकाळी त्यांना दिल्ली पोलिसांनी पकडून अटक केली आणि फैजाबाद येथील जिल्हा कारागृहात बंद केले. शचींद्रनाथ संन्याल व योगेश चटर्जी कैदेतच होते. त्यांच्यावरही संघटनेचे नेतृत्व करणारे म्हणून या खटल्यात त्यांना गोवले. शचींद्रनाथ बक्षी यांनाही नंतर अटक झाली. चंद्रशेखर आझाद मात्र शेवटपर्यंत सापडले नाहीत. आरोपींवर सम्राटाविरुद्ध युध्द घोषित केल्याचे आरोप ठेवण्यात आले. सरकारच्या वतीने पंडित जगत् नारायणलाल हे वकील होते तर आरोपींच्या वतीने पं. गोविंदवल्लभ पंत, बी. के. चौधरी, मोहनलाल सक्सेना व चंद्रभान गुप्त हे काम चालवीत होते. बरेच दिवस खटला चालून ७ एप्रिल १९२७ रोजी अशफाक खान यांच्यासह चार जणांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. आणि १९ डिसेंबरला अशफाक खान यांना फाशी देण्यात आली.याच दिवशी पं. रामप्रसाद बिस्मिल यांनाही फाशी देण्यात आली. भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात अशफाक उल्ला खान यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांच्या बलिदानाने स्वातंत्र्य संग्राम अधिक जोमाने पुढे गेला आणि लाखो लोकांना प्रेरणा मिळाली.अविवाहीत असणाऱ्या अशफाक खान या स्वातंत्र्यसेनानी, लेखक, कवी यांनी असा नारा दिला होता....

''आजाद ही हो लेंगे, या सर ही कटा देंगे।
तुम हाथ उठाओगे, हम पैर बढा देंगे।
चरखे से जमी को हम, ताचर्ख गुंना देंगे।
है जान हथेली पर, एक दम में गवा देंगे।''

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559